"प्रधानमंत्री फसल विमा योजनेंतर्गत पूरक अनुदान" या योजनेअंतर्गत प्रधानमंत्री पीक विमा योजना- खरीप हंगाम २०२४ करिता रु.५,०८,५४,९५३/- इतकी रक्कम विमा कंपन्यांना वितरीत करण्यासाठी, मान्यता देण्याबाबत..

**महाराष्ट्र शासन**
**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः प्रपिवियो-२०२५/प्र.क्र.२७३/११ अे,ई.ऑ.क्र. १३०२०५५**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख: १८ मार्च, २०२६.

**वाचा-**

१. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र.प्रपिवियो-२०१९/प्र.क्र.१२/११-अे, दि. ३१.०५.२०१९
२. कृषि व पदुम विभाग, शासन परिपत्रक क्र. प्रपिवियो-२०१९/प्र.क्र.१२/११-अे, दि. ११.०९.२०१९
३. वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र. अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.७.४.२०२५
४. संचालक (कृषि प्रक्रिया व नियोजन), कृषि आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्र.कृषिआ/सां.८ /न्युन.१०००/kh-२४/र-६१/२०२६, दि.२७.०१.२०२६

**प्रस्तावना :-**

केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री फसल विमा योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, पात्र शेतकऱ्यांना नुकसान भरपाई निश्चित करण्याची कार्यवाही करण्यात येते. काही प्रकरणी पीक विमा नुकसान भरपाई अत्यंत कमी प्रमाणात परिगणित होत असल्याने, अशा प्रकरणांमध्ये लाभार्थी शेतकऱ्यांना विम्याच्या परताव्यापोटी नुकसान भरपाई रक्कम रु.१०००/- पेक्षा कमी येत असल्यास, किमान रक्कम रु.१०००/ अदा करण्यास संदर्भ क्र. (१) येथील शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात आली आहे. तद्नंतर संदर्भ क्र.२ येथील शासन परिपत्रकान्वये याबाबतची कार्यपध्दती विहीत करण्यात आली आहे. संचालक (कृषि प्रक्रिया व नियोजन) कृषि आयुक्तालय, पुणे यांच्या संदर्भ क्र. (४) च्या पत्रान्वये मागणी केल्यानुसार, "प्रधानमंत्री फसल विमा योजनेंतर्गत पूरक अनुदान" योजनेअंतर्गत प्रधानमंत्री पीक विमा योजना- खरीप हंगाम २०२४ करिता रु.५,०८,५४,९५३/- इतकी रक्कम वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

"प्रधानमंत्री फसल विमा योजनेंतर्गत पूरक अनुदान" या योजनेअंतर्गत कृषि आयुक्तालयाने संदर्भ क्र.४ येथील पत्रान्वये प्रस्तावित केल्यानुसार, प्रधानमंत्री पीक विमा योजना- खरीप हंगाम २०२४

करिता स्तंभ क्र. ८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे, रु.५,०८,५४,९५३/- इतकी रक्कम आयुक्त(कृषि) यांना खालीलप्रमाणे वितरीत करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

**खरीप हंगाम २०२४**

| अ.क्र. | विमा कंपनीचे नाव | नुकसान भरपाई पात्र शेतकरी संख्या | एकुण नुकसान भरपाई देय रक्कम (रु.) | विमा कंपनीकडून देय निश्चित नुकसान भरपाई रक्कम (रु.) | राज्य शासन देय तफावत रक्कम भार (रु.) | NCIP Portal नुसार आयुक्त कार्यालयाने वितरणासाठी प्रस्तावित केलेली राज्य शासन देय तफावत रक्कम भार (रु.) | वितरीत करण्यात येणारा राज्य शासन देय तफावत रक्कम भार (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४ )=(३*१०००) | (५) | (६)= (४-५) | (७) | (८) |
| १ | भारतीय कृषि विमा कंपनी | १८५३९ | १८५३९००० | १०५५००२४ | ७९८८९७६ | ७९८८९७६ | ७९८८९७६ |
| २ | चोलामंडलम एम.एस. ज. इं. कं. | ६९५१ | ६९५१००० | ४३३५२११ | २६१५७८९ | २६१५७८९ | २६१५७८९ |
| ३ | एचडीएफसी इर्गो ज. इं. कं. लि | ६५४७ | ६५४७००० | ४१५४४८८ | २३९२५१२ | २३९२५१२ | २३९२५१२ |
| ४ | आयसीआयसीआय लोंबार्ड ज. इं. कं. | २०२० | २०२०००० | १३८८३६६ | ६३१६३४ | ६३१६३४ | ६३१६३४ |
| ५ | ओरिएन्टल इन्शुरन्स कं. लि. | ४८२८९ | ४८२८९००० | २७२६६३३५ | २१०२२६६५ | २१०२२६६५ | २१०२२६६५ |
| ६ | रिलायन्स ज. इं. कं.लि. | ८७३७ | ८७३७००० | ५४३९७९२ | ३२९७२०८ | ३२९७२०८ | ३२९७२०८ |
| ७ | एसबीआय जनरल इन्शुरन्स कं.लि. | ६९०१ | ६९०१००० | ४२२६०३० | २६७४९७० | २६७४९७० | २६७४९७० |
| ८ | युनायटेड इंडिया इ. कं. लि. | २४७९१ | २४७९१००० | १७७७७१४१ | ७०१३८५९ | ७०१३८५९ | ७०१३८५९ |
| ९ | युनिव्हर्सल सोम्पो ज. इं. कं.लि. | ५१९४ | ५१९४००० | १९७६६६० | ३२१७३४० | ३२१७३४० | ३२१७३४० |
| | **एकुण** | **१२७९६९** | **१२७९६९०००** | **७७११४०४७** | **५०८५४९५३** | **५०८५४९५३** | **५०८५४९५३** |

२. प्रस्तुत बाबींवर होणारा खर्च खालील लेखाशिर्षाखाली सन २०२५-२६ करिता मंजूर केलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीतून भागविण्यात यावा :-

**मागणी क्र. डी -३**
**२४०१ - पीक संवर्धन**
**११०, पीक विमा (००) (१०) प्रधानमंत्री फसल विमा योजनेंतर्गत पूरक अनुदान**
**(२४०१ B ०५२) (अनिवार्य)**
**३३, अर्थसहाय्य**

३. सदर शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात येणारा निधी, प्रधानमंत्री फसल विमा योजनेंतर्गत पूरक अनुदान योजनेच्या शासन निर्णय व योजनेसंदर्भातील अवलंबवावयाची कार्यपध्दती आणि अटी व शर्तीनुसारच खर्च करण्याची जबाबदारी आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांची राहील.

४. उपरोक्तप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या निधीच्या विनियोगाबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र आयुक्त (कृषि) शासनास सादर करतील.

५. प्रस्तुत प्रयोजनार्थ आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना "नियंत्रक अधिकारी" तर सहायक संचालक (लेखा), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

६. प्रस्तुत शासन निर्णय, वित्त विभागाने अनौ.सं.क्र. ९१/२०२६/व्यय-१, दि.०९.०३.२०२६ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

७. प्रस्तुत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०३१८१८५१४९६८०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

PRATIBHA MADHAV PATIL

Digitally signed by PRATIBHA MADHAV PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT, 2.5.4.20=b693d975fffc642fe6b87c2ce9e1297fd1e8bda9b459f85f75f159984ba680fd, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=DA026E85AE8CBB4E3C2ACDBECBBF2F6D6CB0AE6ED5C1E54483490119EE0456AD, cn=PRATIBHA MADHAV PATIL
Date: 2026.03.18 18:52:49 +05'30'

**(प्रतिभा पाटील)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव
३. मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास व गृहनिर्माण) यांचे सचिव
४. मा.उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक व औकाफ) यांचे सचिवज
५. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव/विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
६. मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव/विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
७. अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई,
८. आयुक्त, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
९. संचालक (कृषि प्रक्रिया व नियोजन), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१०.मुख्य सांख्यिक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
११.संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
१२.सहाय्यक संचालक (लेखा), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१३.जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
१४.महालेखापाल, महाराष्ट्र -१/२, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
१५.वित्त विभाग (व्यय-१/ अर्थ-१३), मंत्रालय, मुंबई- ३२
१६.उप सचिव (११ अे/ २ अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक
१७.कक्ष अधिकारी (२ अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
१८. विभागीय व्यवस्थापक, भारतीय कृषि विमा कंपनी, लोक चेंबर्स, मरोल मरोशी नाका, मरोल. अंधेरी(पूर्व), मुंबई - ४०० ०५९.
१९.विभागीय व्यवस्थापक, आयसीआयसीआय लोंबार्ड जनरल इन्शुरन्स कं.लि., आयसीआयसीआय हाऊस, ४१४, वीर सावरकर मार्ग, सिध्दीविनायक मंदिराजवळ, प्रभादेवी, मुंबई- ४०० ०२५.

२०.विभागीय व्यवस्थापक, एचडीएफसी इर्गो इन्शुरन्स कं. लि. डी-१०३ तीसरा मजला ईटन बिझनेस, डिस्ट्रीक्ट एल.एस.बी. मार्ग भांडुप (पश्चिम), मुंबई- ४०००७८

२१.विभागीय व्यवस्थापक, ओरिएन्टल इन्शुरन्स कं.लि. पुणे.

२२.विभागीय व्यवस्थापक, युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लिमिटेड, ३ रा मजला, काकडे ब्रिझ आयकोन युनिट क्र.२०२ ते २०७, गणेशखिंड मार्ग, शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

२३.विभागीय व्यवस्थापक, युनिवर्सल सोम्पो जनरल इन्शुरन्स कं. लि. मुंबई

२४.विभागीय व्यवस्थापक, चोलामंडलम एम एस जनरल इन्शुरन्स कं. लि., पुणे

२५.विभागीय व्यवस्थापक, रिलायन्स जनरल इन्शुरन्स कं. लि, मुंबई

२६.विभागीय व्यवस्थापक, एस बी आय जनरल इन्शुरन्स कं.लि. पुणे

२७.निवड नस्ती (कार्यासन ११-अे).